# विधानपरिषद विनंती-अर्ज समिती

(२०१७-२०१८)

**'वर्धा-यवतमाळ-नांदेड जिल्ह्यातील रेल्वे मार्गावरील शेतक-यांच्या जमिनी संपादित करीत असताना प्रत्येक जिल्ह्यातील जमिनींच्या दरामध्ये तफावत असल्याबाबत' या विषयावरील श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा**

# अहवाल

(दिनांक  जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, नागपूर
जुलै, २०१८

# विधानपरिषद विनंती-अर्ज समिती

(२०१७-२०१८)

'वर्धा-यवतमाळ-नांदेड जिल्ह्यातील रेल्वे मार्गावरील शेतक-यांच्या जमिनी संपादित करीत असताना प्रत्येक जिल्ह्यातील जमिनींच्या दरामध्ये तफावत असल्याबाबत' या विषयावरील श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा

# अहवाल

## विधानपरिषद विनंती अर्ज समिती

## (२०१७-२०१८)

१. श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख
२. श्री. नागोराव गाणार, वि.प.स.
३. प्रा.डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
४. श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.
५. श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

*१ ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.
*२ ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.
**३ प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः-
डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM)
श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

---

*ॲड. रामहरी रूपनवर वि.प.स व ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांची दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

**प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांची दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी विशेष निमंत्रित म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

## विधानपरिषद विनंती अर्ज समिती

## (२०१६-२०१७)

१. श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख
२. * श्री. गिरीष व्यास, वि.प.स.
३. *प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
४. *श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
५. *प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

श्री. कपिल पाटिल, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः-

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री. यु. के. चव्हाण, सचिव
श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

---

*सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, प्रकाश बिनसाळे, अमरनाथ राजुरकर, वि.प.स. यांच्या रिक्त झालेल्या जागी अनुक्रमे सर्वश्री. गिरीष व्यास, तानाजी सावंत, आनंद ठाकूर वि.प.स. यांची दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

## प्रस्तावना

'वर्धा-यवतमाळ-नांदेड जिल्ह्यातील रेल्वे मार्गावरील शेतक-यांच्या जमिनी संपादित करीत असताना प्रत्येक जिल्ह्यातील जमिनींच्या दरामध्ये तफावत असल्याबाबत'या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांनी दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी दिली व दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी प्रस्तुतचा विनंती अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती अर्ज त्याच दिवशी विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. (परिशिष्ट-एक)

विनंती अर्जात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांबाबत शासनाकडून आवश्यक ती माहिती मिळावी म्हणून उक्त विनंती अर्ज महसूल व वन (वने) विभागाकडे पाठविण्यात आला. या संबंधीची माहिती महसूल व वन (वने) विभागाकडून दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ व दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी प्राप्त झाली.

समितीने विनंती-अर्जाच्या संदर्भात विनंती अर्ज सादर करणा-या मूळ विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव, जिल्हाधिकारी-वर्धा, यवतमाळ व नांदेड व अन्य अधिका-यांच्या दिनांक ३ ऑक्टोबर २०१७ व २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी साक्षी नोंदविल्या.

विनंती-अर्जासंबंधी विभागाने पाठविलेली माहिती (परिशिष्ट-दोन) तसेच साक्षीच्या वेळी समितीस मिळालेली अधिक माहिती याचा सर्वंकष विचार करून समितीने अहवाल तयार केला व दिनांक १७ जुलै, २०१८ रोजीच्या बैठकीत संमत केला.

विधान भवन :
नागपूर,
दिनांक १७ जुलै,२०१८

**माणिकराव ठाकरे,**
उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा
समिती प्रमुख, विनंती-अर्ज समिती.

# अहवाल

मी विधानपरिषद विनंती-अर्ज समितीचा समितीप्रमुख, समितीच्या वतीने हा अहवाल सादर करीत आहे.

**'वर्धा-यवतमाळ-नांदेड जिल्ह्यातील रेल्वे मार्गावरील शेतक-यांच्या जमिनी संपादित करीत असताना प्रत्येक जिल्ह्यातील जमिनींच्या दरामध्ये तफावत असल्याबाबत'** या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांनी दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी दिली व दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी प्रस्तुतचा विनंती अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती अर्ज त्याच दिवशी विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. (परिशिष्ट-एक)

अर्जदारांनी विनंती अर्जात नमूद केले आहे की, वर्धा-यवतमाळ-नांदेड जिल्हयातील रेल्वे मार्गावरील शेतक-यांच्या जमिनी संपादित करीत असताना प्रत्येक जिल्हयातील जमिनींच्या दराबाबत तफावत असल्याने शेतक-यांनी होणा-या अन्यायाबाबत विरोध दर्शविला आहे.

वर्धा-यवतमाळ-नांदेड या रेल्वेमार्गासाठी तेथील शेतक-यांच्या जमिनी संपादित करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. ब-याच शेतक-यांनी आपल्या जमिनी शासनास विविध अटी- शर्ती नुसार संपादित करण्यास परवानगी दिली. परंतु शेतक-यांच्या जमिनी संपादित करीत असताना शासनातर्फे प्रत्येक जिल्ह्यातील जमिनींच्या शासनाने ठरविलेल्या दरामध्ये मोठी तफावत आढळून आल्याचे दिसत आहे. शेतजमिन व बिगर शेतजमिन यांच्या किंमती प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळया आहेत. शेतक-यांच्या माहितीनुसार नांदेड जिल्ह्यात जमिनीचे भाव वाढवून दिले आहेत, तर त्याच्या तुलनात्मक दृष्टया वर्धा-यवतमाळ जिल्ह्यामध्ये जमिनीचे दर अत्यंत कमी दिलेले आहेत, असे तेथील शेतक-यांचे म्हणणे असून आपण सदर विषयात लक्ष घालून शेतक-यांना योग्य तो न्याय मिळवून देण्याबाबत महाराष्ट्र विधानपरिषदेच्या विनंती अर्ज समिती मार्फत आमच्यावरील झालेल्या अन्यायाचे निवारण करावे व अन्यायधारकास न्याय मिळण्यासाठी समितीने शिफारस करण्याबाबतची मागणी विनंती अर्जात केलेली आहे.

समितीच्या दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या वेळी महसूल व वन (वने)विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट-दोन अ) मध्ये असे नमूद केले आहे की, वर्धा-यवतमाळ-नांदेड ही रेल्वे लाईन मुख्यत्वे पाच जिल्ह्यातून जात असून सदर जिल्हे वर्धा, यवतमाळ, वाशिम, हिंगोली व नांदेड असे आहेत. सदर रेल्वे प्रकल्पासाठी या पाच जिल्ह्यातील एकूण १७५२.२२ हेक्टर जमिन भूसंपादन करावयाची असून त्यापैकी ६४१.९६ हेक्टर जमिनीचे संपादन झालेले आहे. उर्वरित १११०.२६ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनांची कार्यवाही प्रगती पथावर असून डिसेंबर, २०१७ पर्यंत भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करण्याची कालमर्यादा ठरवून दिलेली आहे.

सदर साक्षीसाठी विनंती अर्जातील मुद्दयांच्या अनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक अद्ययावत अहवाल वर्धा-यवतमाळ-नांदेड जिल्ह्यातील रेल्वे मार्गावरील संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून मागविण्यात आला आहे. त्यांचेकडून प्राप्त अहवालानुसार शेतक-यांच्या जमिनीचा मोबदला ठरविताना भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ या कायद्यातील तरतुदीनुसार सदर गावांतील मागील तीन वर्षातील खरेदी-विक्री व्यवहार व शीघ्रसिध्द गणकातील दिलेले मुल्यांकन यांचा तौलनिक विचार करून त्यावर सहायक संचालक, नगररचना विभाग यांचे अभिप्राय प्राप्त करून त्याप्रमाणे भूसंपादनाचा दर निश्चित करण्यात येतो. सहायक संचालक, नगर रचना हे जमिनीच्या मूल्यांकनाबाबत सक्षम प्राधिकारी असल्यामुळे त्यांचे अभिप्राय प्राप्त केल्यानंतरच अंतिम निवाड्यात त्याप्रमाणे मूल्यांकन देण्यात येते. त्यामुळे शेतक-यांना कमी मोबदला दिला जात आहे हे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही.

विनंती अर्जात दिल्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यातील शीघ्रसिध्द गणक व त्यानुसार जमिनीचे मूल्यांकन स्थानिक परिस्थितीनुसार निरनिराळे असू शकते. तसेच खरेदी-विक्री व्यवहार सुध्दा वेगवेगळे असू शकतात. त्यामुळे जमिनीचे दर हे सुध्दा वेगवेगळे असु शकतात असे प्राप्त अहवालावरून आढळून आले आहे.

विनंती अर्जातील सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारात वेगवेगळे दर आकारण्यात येतात परंतु याबाबत विभागाने असे सुचविले की, जमिनीचे मूल्यांकन करीत असताना फक्त शीघ्रसिध्द गणकावर अवलंबून राहत नाही. शीघ्रसिध्द गणकाचे दर त्याचप्रमाणे गेल्या तीन वर्षातील त्या भागातील

खरेदी-विक्रीचे प्रत्यक्षात झालेले व्यवहार बघण्यात येतात. जे व्यवहार रेकॉर्डवर उपलब्ध आहेत त्या व्यवहारांची उचित नोंद घेतली जाते. त्याच्या आधारे निवाडा केला जातो. निवाडा झाल्यावर शेतक-यांना वाटले की योग्य दर मिळाला नाही तर त्याची कार्यपध्दती कायद्यात नमूद केलेली आहे.त्यामध्ये प्राधिकरण स्थापन करण्याची तरतुद आहे. काही जिल्ह्यामध्ये शीघ्रसिध्द गणकाचे दर कमी आहेत, प्रत्येक जिल्ह्यात शीघ्रसिध्द गणकाचे दर सारखे राहणार नाहीत कारण प्रत्येक जिल्ह्यातील जमिनींचे दर सारखे नाहीत. स्थानिक परिस्थितीनुसार दर ठरविले जातात. पुणे जिल्ह्यातील जमिनीचे दर वेगळे असतील, वाशिम जिल्ह्यातील जमिनीचे दर वेगळे असतील स्थानिक परिस्थितीनुसार त्या भागात जमिनीला किती मागणी आहे, त्या जमिनीचा विकास कशाप्रकारे होत आहे या बाबींवर जमिनीचे दर अवलंबुन असतात. जेथे जास्त सुपीक जमिन आहे तेथे जमिनीचे दर जास्त असतात. जेथे जमिन खडकाळ व सुपीक नसते तेथील जमिनींचे दर कमी असतात. प्रत्येक जमिनीची प्रतवारी व स्वरूप वेगवेगळे आहेत. स्थानिक परिस्थितीचा विचार करून अशा प्रकारचा निवाडा केला जातो किंवा निगोशिएशनचा वेगळा शासन निर्णय आहे त्याप्रमाणे चार पट रक्कम देण्या ऐवजी पाचपट रक्कम देण्यात येते.

समितीच्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या बैठकीच्या वेळी महसूल व वन (वने)विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट- दोन ब) मध्ये नमूद केले आहे की, वर्धा-यवतमाळ-नांदेड ही रेल्वे लाईन मुख्यत्वे पाच जिल्ह्यातून जात असून सदर जिल्हे पुढीलप्रमाणे आहेत वर्धा, यवतमाळ, वाशिम, हिंगोली व नांदेड असे आहेत. सदर रेल्वे प्रकल्पासाठी या पाच जिल्ह्यातील एकूण १७५४.४५ हेक्टर जमिन भूसंपादन करावयाची असून त्यापैकी ११३६.६१३२ हेक्टर जमिनीचे संपादन झालेले आहे. उर्वरित ५७७.४१ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनांची कार्यवाही प्रगती पथावर असून मार्च, २०१८ पर्यंत भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण होणार असल्याबाबत संबंधित जिल्हाधिका-यांकडून कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

सदर साक्षीसाठी विनंती अर्जातील मुद्दांच्या अनुषंगाने वर्धा-यवतमाळ-नांदेड या रेल्वे मार्गाशी संबंधित उपरोक्त वर्धा-यवतमाळ-नांदेड या पाच जिल्ह्यांचा वस्तुस्थितीदर्शक अद्ययावत अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांचे कडून मागविण्यात आला आहे. त्यांचेकडून प्राप्त अहवालानुसार शेतक-यांच्या जमिनीचा मोबदला ठरविताना भुमि

संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ या कायद्यातील तरतुदीनुसार सदर गावातील मागील तीन वर्षातील खरेदी विक्री व्यवहार व शिघ्रसिध्द गणकातील दिलेले मूल्यांकन यांचा तौलनिक विचार करून त्यावर सहायक संचालक, नगर रचना विभाग यांचे अभिप्राय प्राप्त करून त्याप्रमाणे भुसंपादनाचा दर निश्चित करण्यात येतो. सहायक संचालक, नगर रचना हे जमिनीच्या मूल्यांकनाबाबत सक्षम अधिकारी असल्यामुळे त्याचे अभिप्राय प्राप्त केल्यानंतरच अंतिम निवाड्यात त्याप्रमाणे मूल्यांकन देण्यात येते. त्यामुळे शेतक-यांना कमी मोबदला दिला जात आहे, हे म्हणणे संयुक्तीक वाटत नाही.

विनंती अर्जात दिल्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यातील शीघ्रसिध्द गणक व त्यानुसार जमिनीचे मूल्यांकन निरनिराळे असू शकते तसेच खरेदी विक्री व्यवहार हे सुध्दा वेगवेगळे असू शकतात असे प्राप्त अहवालावरून आढळून आले आहे.

वर्धा-यवतमाळ-वाशिम-हिंगोली-नांदेड या पाच जिल्ह्यातून जाणा-या रेल्वे मार्गाच्या भूसंपादनाचे काम सुरू आहे. पाचही ठिकाणचे संबंधित भूसंपादन अधिकारी येथे काम करीत आहेत. रेल्वे मार्गात ज्या शेतक-यांची जमिन बाधित होत आहेत त्याचे भूसंपादन करताना त्या जमिनीच्या मागच्या तीन वर्षाचे खरेदी-विक्रीचे व्यवहार, शिघ्रसिध्द गणकाचे दर यापैकी कमाल दर घेवून त्या आधारे मोजमाप केले जाते. जमिनीच्या बाजारभावाला तेथील गुणकाने गुणले जाते. तसेच त्या जमिनीवर झाडे, विहिरी अशी काही मालमत्ता असेल तर त्याची देखील किंमत त्या किंमतीमध्ये समाविष्ट केली जाते. त्यावर १००% दिलासा रक्कम दिली जाते आणि अंतिम भरपाईची रक्कम काढली जाते. त्यामुळे प्रथमदर्शनी असे वाटते की, एका जिल्ह्याला जास्त मिळत आहे तर दुस-यां जिल्ह्याला कमी दर मिळत आहे. मुलभूत फरक हा आहे की, बाजारभाव काढण्याच्या पध्दती मध्ये जमिनीचा विशिष्ट बाजारभाव काढला जातो. शेतक-यांना जास्तीत जास्त नुकसानभरपाई कशी मिळावी यासंबंधीचा हा विनंती अर्ज असून या पाचही जिल्ह्यापैकी ज्या जिल्ह्याच्या जमिनीचे भाव जास्त असतील त्यांना न्याय्य नुकसानभरपाई आणि भूसंपादन पुनर्वसन पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ (LARR) कायद्यानुसार ते बाकीच्याना लागू करावे. म्हणजे जिल्ह्याच्या लोकांना असे वाटणार नाही की त्यांना मावेजा जास्त आम्हाला कमी अशी भावना निर्माण होणार नाही.

**अभिप्राय व शिफारशी**:-वर्धा-यवतमाळ-नांदेड जिल्ह्यातील रेल्वे मार्गावरील शेतक-यांच्या जमिनी संपादित करीत असताना प्रत्येक जिल्ह्यातील जमिनीच्या दरामध्ये तफावत असल्याबाबत' या विषयावरील विनंती अर्ज श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांनी दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहाला सादर केला आहे. सदर विनंती अर्जात अर्जदारांनी नमूद केले आहे की, वर्धा-यवतमाळ-नांदेड या रेल्वेमार्गासाठी तेथील शेतक-यांच्या जमिनी संपादित करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. ब-याच शेतक-यांनी आपल्या जमिनी शासनास विविध अटी- शर्ती नुसार संपादित करण्यास परवानगी दिली आहे. परंतु शेतक-यांच्या जमिनी संपादित करीत असताना शासनातर्फे प्रत्येक जिल्ह्यातील जमिनींच्या शासनाने ठरविलेल्या दरामध्ये मोठी तफावत आढळून आल्याचे दिसत आहे. शेतजमिन व बिगर शेत जमिन यांच्या किमती प्रत्येक जिल्ह्यात वेग-वेगळया आहेत. तर त्याच्या तुलनात्मक दृष्टया वर्धा-यवतमाळ-नांदेड जिल्ह्यामध्ये जमिनीचे दर अत्यंत कमी दिलेले आहेत असे तेथील शेतक-यांचे म्हणणे आहे. याकडे शासनाने लक्ष घालून त्यांना योग्य तो न्याय मिळवून द्यावा अशी अर्जदारांनी विनंती केली आहे.

उक्त विनंती अर्जातील विषयासंदर्भात विभागाने दिलेल्या माहितीत नमूद केले आहे की, 'वर्धा-यवतमाळ-नांदेड हा रेल्वे मार्ग मुख्यत्वे पाच जिल्ह्यातून जात असून यात वर्धा, यवतमाळ, वाशिम, हिंगोली, व नांदेड या जिल्ह्यांचा समावेश आहे. सदर रेल्वे प्रकल्पासाठी या पाच जिल्ह्यातील एकूण १७५४.४५ हेक्टर जमिन भूसंपादन करावयाची असून त्यापैकी ११३६.६१३२ हेक्टर जमिनीचे संपादन झालेले आहे. उर्वरीत ५७७.६१३२ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनाची कार्यवाही सुरू असून मार्च २०१८ पर्यंत भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण होणार असल्याबाबत संबंधित जिल्हाधिका-यांनी कालमर्यादा निश्चित केली आहे. सदर विषयी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार शेतक-यांच्या जमिनीचा मोबदला ठरविताना भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ च्या कायद्यातील तरतुदीनुसार सदर गावातील मागील तीन वर्षातील खरेदी विक्री व्यवहार व शिघ्रसिध्द गणकातील दिलेले मूल्यांकन यांचा तौलनिक विचार करून त्यावर सहायक संचालक, नगर रचना विभाग यांचे अभिप्राय प्राप्त करून त्याप्रमाणे भूसंपादनाचा दर निश्चित करण्यात येतो. सहायक संचालक, नगर रचना हे जमिनीच्या मूल्यांकनाबाबत सक्षम अधिकारी

असल्यामुळे त्यांचे अभिप्राय प्राप्त केल्यानंतरच अंतिम निवाड्यात त्याप्रमाणे मूल्यांकन देण्यात येते. प्रत्येक जिल्ह्यातील शिघ्रसिध्द गणक व त्यानुसार जमिनीचे मूल्यांकन निरनिराळे असू शकते. तसेच खरेदी विक्री व्यवहार हे सुध्दा वेगवेगळे असु शकतात असे प्राप्त अहवालावरून आढळून आले आहे.

सदर प्रकरणी दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने मत व्यक्त केले कि, शिघ्रसिध्द गणकाचा दर पाच लाख रूपये एकर असेल तर प्रत्यक्षात १५ लाख रूपये एकर जमिनीचे दर आहेत. आता शासनाने नविन धोरण जाहीर केले आहे की, अडीच पट जमिनीचा दर द्यावा. प्रत्यक्षात खरेदी करताना किती पैसे दयावे लागतात याचा विचार करून शेतक-यांना योग्य दर मिळाला पाहिजे. यावर विभागीय सचिवांनी नमूद केले की, भूसंपादन करते वेळी शेतक-यांना त्यांच्या जमिनीचा उचित मोबदला मिळावा अशी शासनाची भूमिका आहे. काही जिल्ह्यांमध्ये शीघ्रसिध्द गणकाचे दर कमी आहेत, प्रत्येक जिल्ह्यात शीघ्रसिध्द गणकाचे दर सारखे राहणार नाहीत कारण प्रत्येक जिल्ह्यातील जमिनीचे दर सारखे नाहीत. स्थानिक परिस्थितीनुसार दर ठरविले जातात. स्थानिक परिस्थितीनुसार त्या भागात जमिनीला किती मागणी आहे, त्या जमिनीचा विकास कशा प्रकारे होत आहे, या बाबींवर जमिनीचे दर अवलंबून असतात. ज्या ठिकाणी नागरीकीकरण झपाट्याने होत आहे. जेथे जास्त सुपीक जमीन आहे तेथे जमिनीचे दर जास्त आहेत. जेथे जमिन खडकाळ असून सुपीक नसते, जमिनीची जास्त मागणी नसते तेथील जमिनीचे दर कमी असतात. सगळीकडे जमिनीचे दर सारखे राहणार नाहीत. एक प्रकल्प अनेक जिल्ह्यातून जात असला तरी प्रत्येक जिल्ह्यातील मोबदल्याचे दर सारखे राहणार नाहीत कारण तेथील जमिनीची प्रतवारी व स्वरूप वेगवेगळे आहे. स्थानिक परिस्थितीचा विचार करून अशा प्रकारचा निवाडा जाहीर केला जातो. या प्रकरणात निवाडा जाहीर होईल त्या वेळी आता जी प्रक्रिया विशद केली त्या प्रक्रियेबाबत पुरेशी खबरदारी घेवून निवाडा जाहीर होईल. जमिनीचे मूल्यांकन करतो त्यावेळी दिलासा रक्कम देण्यात येते. त्यामुळे ती किंमत चार पट होते. निगोशिएशनने व्यवहार केला तर पाच पट दर दिला जातो. निगोशिएशनचा एक वेगळा शासन निर्णय आहे. यामध्ये सामंजस्याने कार्यवाही होते त्यामुळे पुढील वाद टळतो, न्यायालयामध्ये केस जात नाही त्यामुळे रक्कम थोडी जास्त दिली जाते.

सध्या वर्धा,यवतमाळ व नांदेड जिल्ह्यातील जमिन संपादनाची कार्यवाही सुरू आहे. नांदेड व यवतमाळ येथील जमिन निगोशिएशनने घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. निगोशिएशनने जमिन घेत असताना जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून दरांबाबत चर्चा होते त्यावेळी यवतमाळ येथील दर अतिशय कमी देण्यात आले आहेत. नांदेड येथील दर जास्त देण्यात आले आहेत. याबाबत यवतमाळ जिल्ह्यात नागरीकांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला आहे. याबाबत अनेक तक्रारी आल्या आहेत. तक्रारी अशा आहेत की, आम्हाला जिल्हाधिकारी यांनी सांगितले की हेच दर आहेत या पेक्षा जास्त दर मिळणार नाहीत. आग्रहाने शेतक-यांकडून सह्या घेण्यात आल्या व ते निगोशिएशनने करण्यात आल्याचे दर्शविले आहे.

**नांदेड व यवतमाळ जिल्ह्यात दरामध्ये फार मोठा फरक आहे अशाप्रकारे अनेक लोकांच्या तक्रारी आल्याने समिती अशी शिफारस करते की, सदर प्रकरणाची पुन्हा एकदा लवकरात लवकर पडताळणी करण्यात यावी जेणेकरून संबंधित शेतक-यांवर अन्याय होऊ नये व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यात पाठविण्यात यावा.**

याच विषयावर समितीने दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची पुन्हा एकदा साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी, नांदेड जिल्ह्यात भूसंपादन करताना योग्य रक्कम मिळत आहे परंतु यवतमाळ जिल्ह्यात ही रक्कम मिळालेली नाही किंवा त्यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे ही तफावत का आहे याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी नमूद केले की, वर्धा,यवतमाळ, वाशिम, हिंगोली, नांदेड या ५ जिल्ह्यातून हा रेल्वे मार्ग जात आहे. भूसंपादन रेल्वेच्या कायद्यानुसार करण्यात येते. भूसंपादन करताना त्या जमिनीचे मागच्या ३ वर्षाचे खरेदीविक्रीचे व्यवहार, शिघ्रसिध्द गणकाचे दर यापैकी कमाल दर घेऊन त्या आधारे पुढील कॅल्क्युलेशन केले जाते. जमिनीच्या बाजारभावाला तेथील गुणकाने गुणले जाते.त्या जमिनीवर झाडे, विहिर अशी काही मालमत्ता असेल तर ती देखील त्या किंमती मध्ये जमा केली जाते, त्यावर १००% सोलॅशियम म्हणजे दिलासा रक्कम दिली जाते आणि अंतिम भरपाईची रक्कम काढली जाते. पाचही जिल्ह्यातील दर समान आलेले नाहीत हे खरे आहे कारण वेगवेगळ्या ठिकाणच्या जमिनीच्या निघालेल्या किमतीनुसार दर आहेत. त्यामुळे प्रथम दर्शनी असे वाटते की, एका जिल्ह्यात जास्त दर मिळत आहे, तर दुस-या जिल्ह्यात कमी दर मिळत आहे.

सन २०१३ चा शासनाचा भूसंपादनाचा कायदा आहे, त्याच्यामध्ये गावनिहाय दर वेगवेगळे आहेत. त्यामुळे लोकांना असे वाटु शकते की, याला जास्त आणि मला कमी मिळाले. गाव निहाय दर बदलतो, त्यामुळे लोकांमध्ये असंतोष पसरतो. समितीचे याबाबत स्पष्ट मत आहे की, पाचही जिल्ह्यापैकी ज्या जिल्ह्याचे दर सर्वात जास्त असतील त्यानुसार ते बाकीच्यांना लागू करावे. गावनिहाय बाकीचा निकष ठरलेला आहे. ज्या जिल्ह्यामध्ये भूसंपादनाचा दर जास्त असेल त्यामध्ये दराचा समावेश करून इतरांनाही तो नियम लागू केल्याने इतर जिल्ह्यांच्या लोकांना वाटणार नाही आणि त्यांच्यात असमानतेची भावना निर्माण होणार नाही. प्रत्येक जिल्ह्यात असमान दर त्याच्या भौगोलिक स्थितीनुसार असल्या तरी शेतक-यांच्या जमिनी कायमस्वरूपी या प्रकल्पात जाणार असल्याने जमिनीचा चांगला व पर्याप्त मोबदला त्यांना मिळणे आवश्यक आहे यासाठी शासनास काही नियम बदलावे लागणार हे जरी खरे असले तरी शेतक-यांना त्यांच्या हितासाठी त्यांना जास्तीत जास्त मोबदला मिळण्याच्या दृष्टीने त्यांच्यातील असमानतेची भावना दूर करून पाचही जिल्ह्यातील शेतक-यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला एकसारखा मिळण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करून **शासनाने सन २०१३ च्या मार्गदर्शक तत्वामध्ये शेतक-यांना योग्य प्रमाणात मुआवजा देण्यासंदर्भात योग्य त्या सुधारणा करण्याबाबत केंद्र शासनाकडे शिफारस करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात कळविण्यात यावी.**

सन २०१३ चा भूसंपादनाचा कायदा केंद्र शासनाचा आहे. हा विषय रेल्वेला दिलेल्या जमिनीचा आहे.केंद्र शासनाचा कायदा असा आहे की, एखाद्या व्यक्तींच्या जमिनीचा वापर सर्व जनतेसाठी होणार असेल तर ज्या जमिन मालकाचे नुकसान होते त्याला जास्त मोबदला मिळाला तर काही हरकत नसते असा त्यांचा दृष्टिकोन असतो. निवाडा करताना असा दृष्टिकोन ठेवून जमिन मालकाला जास्त मोबदला मिळाला पाहिजे असे समितीचे मत आहे.

सदर प्रकरणात नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातील दरामध्ये फार मोठी तफावत आहे व याबाबत तेथील स्थानिकांच्या मोठ्या प्रमाणावर तक्रारी आल्या आहेत. तेथील शेतकरी न्यायासाठी विधानमंडळापर्यंत आलेला आहे आणि अन्याय झाल्याचे सांगत आहे. त्यामुळेच त्यांचा विनंती अर्ज मान्य करण्यात आला आहे. शिघ्रसिध्द गणकाचा दर जिल्हा निहाय वेगवेगळा असू शकतो तथापि या प्रकरणात मोठी तफावत आहे.

एकाच प्रकल्पासंदर्भात समान दर असले पाहिजे तशा पध्दतीने अर्जदारांना अधिक मोबदला मिळणे आवश्यक आहे. **यवतमाळ जिल्ह्यातील जमिन धारकांना त्यांच्या जमिनीचा मोबदला वाढवून देणे आवश्यक असून तो योग्य प्रमाणात वाढवून देण्यासंदर्भात तात्काळ कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट एक

# मूळ विनंती अर्ज

परिशिष्ट - पंड

आनंदराव पाटील
वि. प. स. 9

प्रति,
महाराष्ट्र विधानसभेतील,
महाराष्ट्र विधानपरिषद,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

४४६
३१/७/१६

विषय :- वर्धा- यवतमाळ-नांदेड जिल्ह्यातील रेल्वे मार्गाबरील शेतकऱ्यांच्या जमीनी संपादीत करत असताना शासना तर्फे प्रत्येक जिल्ह्यातील जमिनींच्या दराबाबत तफावत असणेबाबत.

मा. महोदय,

वर्धा-यवतमाळ-नांदेड या रेल्वे मार्गासाठी तेथील शेतकऱ्यांचा जमिनी संपादीत करण्याचे काम सुरु करण्यात आले होते. बऱ्याच शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी शासनास विविध अटी-शर्ती नुसार जमिनी संपादित करण्यास परवानगी दिली आहे. परंतु शेतकऱ्यांचा जमिनी संपादीत करत असताना शासना तर्फे प्रत्येक जिल्ह्यातील जमिनींच्या शासनाने ठरविलेल्या दरामध्ये मोठी तफावत आढळून आल्याचे दिसत आहे. शेत जमिन व बिगर शेत जमिन यांच्या किंमती प्रत्येक जिल्ह्यात वेग-वेगळ्या आहेत. शेतकऱ्यांच्या माहितीनुसार नांदेड जिल्ह्यात जमीनीचे भाव वाढवून दिले आहेत, तर त्याच्या तुलनात्क दृष्टया वर्धा-यवतमाळ जिल्ह्यामध्ये जमीनीचे दर अत्यंत कमी दिलेले आहेत. असे तेथील शेतकऱ्याचे म्हणणे आहे.

तरी आपणांस विनंती आहे की, याकडे शासनाने लक्ष घालून वरील शेतकऱ्यांना योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी कार्यवाही व्हावी, ही विनंती. सदरचा अर्ज विनंती अर्ज समितीकडे आपल्या शिफारशीसह पाठवण्यात यावा, ही विनंती.

आपला,

Apali

(आनंदराव पाटील)
वि.प.स.

सभापती
महाराष्ट्र विधानपरिषद

१५/८/१६ विनंती अर्ज समिती

दि. 2 जुलै 2017

3

प्रति :

मा. आनंदराव पाटील,
वि.प.स.
मुंबई

विषय :- वर्धा- यवतमाळ-नांदेड जिल्हयातील रेल्वे मार्गाबरील शेतकऱ्यांच्या जमीनी संपादीत करत असताना शासना तर्फे प्रत्येक जिल्हयातील जमिनींच्या दराबाबत तफावत असणेबाबत.

मा. महोदय,

वर्धा-यवतमाळ-नांदेड या रेल्वे मार्गासाठी तेथील शेतकऱ्यांचा जमिनी संपादीत करण्याचे काम सुरु करण्यात आले होते. बऱ्याच शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी शासनास विविध अटी-शर्ती नुसार जमिनी संपादित करण्यास परवानगी दिली आहे. परंतु शेतकऱ्यांचा जमिनी संपादीत करत असताना शासना तर्फे प्रत्येक जिल्हयातील जमिनींच्या शासनाने ठरविलेल्या दरामध्ये मोठी तफावत आढळून आल्याचे दिसत आहे. शेत जमिन व बिगर शेत जमिन यांच्या किंमती प्रत्येक जिल्हयात वेग-वेगळ्या आहेत. शेतकऱ्यांच्या माहितीनुसार नांदेड जिल्हयात जमीनीचे भाव वाढवून दिले आहेत, तर त्याच्या तुलनात्मक दृष्टया वर्धा-यवतमाळ जिल्हयामध्ये जमीनीचे दर अत्यंत कमी दिलेले आहेत. असे तेथील शेतकऱ्याचे म्हणणे आहे. तरी आपणांस या निवेदनाद्वारे निदर्शनास आणू इच्छितो.

तरी आपणांस विनंती आहे की, वाकडे शासनाने लक्ष घालून वरील शेतकऱ्यांना योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी कार्यवाही व्हावी, ही विनंती.

सोन आपले, सोन मो. नंबर

१) विजय प्रभाकरराव काळे, यवतमाळ 9822227330
२) चंद्रशेखर ह. चौधरी यवतमाळ 9764411468
३) दिनेश म. गोरारकर यवतमाळ 9822[illegible]05
४) अरुण पंढरीनाथ वाकडे यवतमाळ 9422166503
५) निलेश रा. बोरकर बोटी बु. 15 9420054541

(६) ८

आनंदराव पाटील
वि. प. स. ५

महाराष्ट्र विधानपरिषद

विधानपरिषद
महाराष्ट्र

प्रति,

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.

**विषय :- "औचित्याचा मुद्दा" सभागृहात उपस्थित करण्याकरिता परवानगी मिळणेबाबत.**

**महोदय,**

मी, खालील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर "औचित्याचा मुद्दा" सभागृहात उपस्थित करू इच्छितो, कृपया परवानगी मिळावी, ही विनंती.

* वर्धा-यवतमाळ-नांदेड या रेल्वे मार्गासाठी तेथील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत करण्याचे काम सुरु करण्यात आले होते. बऱ्याच शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी शासनास विविध अटी-शर्ती नुसार जमिनी संपादित करण्यास परवानगी दिली असणे, परंतु शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत करत असताना शासना तर्फे प्रत्येक जिल्ह्यातील जमिनींच्या शासनाने ठरविलेल्या दरामध्ये मोठी तफावत आढळून आल्याचे दिसत असणे, शेत जमिन व बिगर शेत जमिन यांच्या किमती प्रत्येक जिल्ह्यात वेग-वेगळ्या असणे, शेतकऱ्यांच्या माहितीनुसार नांदेड जिल्ह्यात जमीनीचे भाव वाढवून दिले असणे तर त्याच्या तुलनात्मक दृष्टया वर्धा-यवतमाळ जिल्ह्यामध्ये जमीनीचे दर अत्यंत कमी दिलेले असणे असे तेथील शेतकऱ्याचे म्हणणे असणे, याबाबत तात्काळ कार्यवाही व्हावी, अशी मागणी मी, या **औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.**

दिनांक 26-6-16 रोजी
क्र./तु./सं. 3.95 बजता
नियम ९३ अन्वये सूचना / नियम २८९ अन्वये सूचना
औचित्याचा मुद्दा / विशेष उल्लेख सूचना मिळाली.

सचिव तांत्रे सहाय्यक
विधानमंडळ सचिवालय
मुंबई / नागपूर

आपला,

( आनंदराव पाटील )

16

# परिशिष्ट दोन

## विभागाने सादर केलेली

परिशिष्ट-दोन अ

महाराष्ट्र शासन

तात्काळ/विधानमंडळ प्राधान्य

नस्ती क्र.विविअ२०१७/प्र.क्र.९२/अ-१
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- २९.०९.२०१७.

प्रति,
उप सचिव ,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन,
मुंबई - ४०० ०३२.

विषय :- वर्धा -यवतमाळ-नांदेड जिल्ह्यातील रेल्वे मार्गावरील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करीत असताना प्रत्येक जिल्ह्यातील जमिनीच्या दराबाबत तफावत असल्याबाबत या विषयावरील श्री.आनंदराव पाटील, वि.प.स.यांचा विनंती अर्ज

संदर्भ :-आपले कार्यालयीन पत्र क्र.२५८२४/म.वि.स./विपविअस ड-१५, दिनांक १८.९.२०१७

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधीन पत्राचे कृपया अवलोकन व्हावे. सदर पत्रान्वये कळविल्यानुसार विनंती अर्जातील विषयाबाबतच्या अद्ययावत माहितीच्या ४० प्रती या पत्रासोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

आपला,

(अ.रा.रेडेकर)
कक्ष अधिकारी

प्रत-
निवड नस्ती, महसूल व वन विभाग, अ १

विषय:- वर्धा -यवतमाळ-नांदेड जिल्ह्यातील रेल्वे मार्गावरील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करीत असताना प्रत्येक जिल्ह्यातील जमिनीच्या दराबाबत तफावत असल्याबाबत या विषयावरील श्री.आनंदराव पाटील, वि.प.स.यांचा विनंती अर्ज

**उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विनंती अर्जातील नमूद मुद्याच्या अनुषंगाने खालील प्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे :-**

वर्धा -यवतमाळ-नांदेड ही रेल्वे लाईन मुख्यत्वे पाच जिल्ह्यातून जात असून सदर जिल्हे वर्धा, यवतमाळ,वाशिम, हिंगोली व नांदेड असे आहेत. सदर रेल्वे प्रकल्पासाठी या पाच जिल्ह्यांतील **एकूण १७५२.२२ हेक्टर** जमीन भूसंपादन करावयाची असून त्यापैकी **६४१.९६ हेक्टर** जमिनीचे संपादन झालेले आहे. उर्वरित **१११०.२६ हेक्टर** जमिनीच्या भूसंपादनाची कार्यवाही प्रगती पथावर असून **डिसेंबर २०१७ पर्यंत** भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करण्याची कालमर्यादा ठरवून दिलेली आहे.

सदर साक्षीसाठी विनंती अर्जातील मुद्यांच्या अनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक अहवाबात अहवाल वर्धा - यवतमाळ-नांदेड जिल्ह्यातील रेल्वे मार्गातील संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून मागविण्यात आला आहे. त्यांचेकडून प्राप्त अहवालानुसार शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला ठरविताना भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ या कायद्यातील तरतुदीनुसार सदर गावांतील मागील तीन वर्षांतील खरेदी -विक्री व्यवहार व शीघ्रसिध्द गणकांतील दिलेले मूल्यांकन यांचा तौलनिक विचार करून त्यावर सहायक संचालक, नगररचना विभाग यांचे अभिप्राय प्राप्त करून त्याप्रमाणे भूसंपादनाचा दर निश्चित करण्यात येतो. सहायक संचालक, नगर रचना हे जमिनीच्या मूल्यांकनाबाबत सक्षम प्राधिकारी असल्यामुळे त्यांचे अभिप्राय प्राप्त केल्यानंतरच अंतिम निवाड्यात त्याप्रमाणे मूल्यांकन देण्यात येते. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी मोबदला दिला जात आहे हे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही.

विनंती अर्जात दिल्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यातील शीघ्रसिद् ध गणक व त्यानुसार जमिनीचे मूल्यांकन स्थानिक परिस्थितीनुसार निरनिराळे असू शकते. तसेच खरेदी-विक्री व्यवहार हे सुध्दा वेगवेगळे असू शकतात.त्यामुळे जमिनीचे दर हेसुध्दा वेगवेगळे असू शकतात, असे प्राप्त अहवालावरून आढळून आले आहे.

परिशिष्ट - दोन ब

महाराष्ट्र शासन

तात्काळ/विधानमंडळ प्राधान्य

नस्ती क्र.विविअ२०१७/प्र.क्र.९२/अ-१
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- २२.२.२०१७.

प्रति,
उप सचिव ,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन,
मुंबई - ४०० ०३२.

विषय :- वर्धा -यवतमाळ-नांदेड जिल्ह्यातील रेल्वे मार्गावरील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करीत असताना प्रत्येक जिल्ह्यातील जमिनीच्या दराबाबत तफावत असल्याबाबत या विषयावरील श्री.आनंदराव पाटील, वि.प.स.यांचा विनंती अर्ज

संदर्भ :-आपले कार्यालयीन पत्र क्र. ४८७४/म.वि.स./विपविअस ड-१५, दिनांक २०.२.२०१८

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधीन पत्राचे कृपया अवलोकन व्हावे. सदर पत्रान्वये कळविल्यानुसार विनंती अर्जातील विषयाबाबतच्या अद्ययावत माहितीच्या ४० प्रती या पत्रासोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

आपला,

(नि.ग.सोनखासकर )
कक्ष अधिकारी

प्रत-
निवड नस्ती, महसूल व वन विभाग, अ १

विषय:- वर्धा -यवतमाळ-नांदेड जिल्ह्यातील रेल्वे मार्गावरील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करीत असताना प्रत्येक जिल्ह्यातील जमिनीच्या दराबाबत तफावत असल्याबाबत या विषयावरील श्री.आनंदराव पाटील, वि.प.स.यांचा विनंती अर्ज

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विनंती अर्जातील नमुद मुद्याच्या अनुषंगाने खालील प्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे :-

वर्धा -यवतमाळ-नांदेड ही रेल्वे लाईन मुख्यत्वे पाच जिल्ह्यातून जात असून सदर जिल्हे पुढील प्रमाणे आहेत वर्धा -यवतमाळ-वाशिम- हिंगोली व नांदेड असे आहेत. सदर रेल्वे प्रकल्पासाठी या पाच जिल्हयातील एकूण १७५४.४५ हेक्टर जमीन भूसंपादन करावयाची असून त्यापैकी ११३६.६१३२ हेक्टर जमीनीचे संपादन झालेले आहे. उर्वरित ५७७.४१ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनाची कार्यवाही प्रगती पथावर असून मार्च २०१८ पर्यंत भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण होणार असल्याचे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

सदर साक्षसाठी विनंती अर्जातील मुद्यांच्या अनुषंगाने वर्धा -यवतमाळ-नांदेड या रेल्वे मार्गाशी संबंधित उपरोक्त वर्धा-यवतमाळ-नांदेड या पाच जिल्ह्यांचा वस्तुस्थितीदर्शक अद्ययावत अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांचे कडून मागविण्यात आला आहे. त्यांचेकडून प्राप्त अहवालानुसार शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला ठरविताना भुमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ या कायद्यातील तरतूदीनुसार सदर गावातील मागील तीन वर्षातील खरेदी विक्री व्यवहार व शिघ्रसिध्द गणकातील दिलेल्या मुल्यांकन यांचा तौलनीक विचार करून त्यावर सहायक संचालक, नगर रचना विभाग, यांचे अभिप्राय प्राप्त करून त्याप्रमाणे भुसंपादनाचा दर निश्चित करण्यात येतो. सहायक संचालक, नगर रचना हे जमिनीच्या मुल्याकनाबाबत सक्षम अधिकारी असल्यामुळे त्याचे अभिप्राय प्राप्त केल्यानंतरच अंतिम निवाड्यात त्याप्रमाणे मूल्यांकन देण्यात येते. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी मोबदला दिला जात आहे, हे म्हणने संयुक्तीक वाटत नाही.

विनंती अर्जात दिल्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यातील शिघ्रसिध्द गणक व त्यानुसार जमिनीचे मुल्यांकन निरनिराळे असू शकते तसेच खरेदी विक्री व्यवहार हे सुध्दा वेगवेगळे असू शकतात असे प्राप्त अहवालावरून आढळून आले आहे.

# परिशिष्ट तीन

## समितीच्या बैठका

## पहिली बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक मंगळवार, दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी दुपारी १२.३० वाजता कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) मा. माणिकराव ठाकरे, उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख

**विशेष निमंत्रित**

श्री. आनंदराव पाटिल, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः-**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

**विभागीय अधिकारी, महसूल व वन (वने)**

(१) श्री. मनु कुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव
(२) श्री. सु. वि. गावडे, सहसचिव, (भूसंपादन)

**जिल्हाधिकारी कार्यालयः-**

(१) श्री. चंद्रकांत जाजू, उपजिल्हाधिकारी, यवतमाळ
(२) श्री. बी. एम. कांबळे, उपजिल्हाधिकारी, नांदेड
(३) डॉ. शरद जावळे, उपजिल्हाधिकारी, वाशिम

समितीने विनंती अर्जाच्या संदर्भात विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव महसूल व वन (वने), जिल्हाधिकारी यवतमाळ, नांदेड, वाशिम व अन्य अधिका-यांच्या साक्षी नोंदविल्या.

## दुसरी बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक शुक्रवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता, कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) मा. माणिकराव ठाकरे, उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख
(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.
(३) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः-**

(१) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
(२) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

**विभागीय अधिकारी महसूल व वन (वने) :-**

(१) श्री. विकास खारगे, सचिव
(२) श्री. सु. वि. गावडे, सहसचिव, (भूसंपादन)

**जिल्हाधिकारी कार्यालयः-**

(१) श्री. सुनिल महिंद्रकर, उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) नांदेड
(२) श्री. रमण जैन, उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) वर्धा

समितीने विनंती अर्जाच्या संदर्भात विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव महसूल व वन (वने), जिल्हाधिकारी नांदेड , वर्धा व अन्य अधिका-यांच्या साक्षी नोंदविल्या.

## तिसरी बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक मंगळवार, दिनांक १७ जुलै, २०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता कक्ष क्र. ०२ तळ मजला, मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे दालन, विधान भवन, नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) मा. माणिकराव ठाकरे, माननीय उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख
(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.
(३) श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.
(४) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

(१) ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.
(२) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.
(३) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव,
(२) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

सदर बैठकीत समितीने प्रारुप अहवालावर विचारविनिमय करून तो संमत केला.

शासकीय मुद्रणालय, नागपूर